# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. ४०
# सभा क्र.५७, दिनांक १६/१२/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची सभा शुक्रवार, दि. १६/१२/२०२२ रोजी, दुपारी ४.०० (चार) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचेकामकाजाचाआढावा**

**विषय क्र.१२१८**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/ नगररोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे नोव्हेंबर २०२२ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उपआयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१ यांचे जा.क्र. उप–१/७००९, दि. १३/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र.१२१९**

दि. २१/११/२०२२ ते दि. २७/११/२०२२ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनीजा.क्र. मआ/अग्निशमन/९६२, दि. ७/१२/२०२२ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१२२०**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. २, कार्यालय अधिनस्त असलेल्या औंध–बाणेर क्षेत्रिय , शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरूड – बावधन कार्यालयाकडील कामांच्या दि. ०१/११/२०२२ ते दि. ३०/११/२०२२ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज)यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/९८२, दि. १४/१२/२०२२चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्र. १२२१**

करआकारणी व करसंकलन कार्यालयाकडील पेठ येरवडा अे फॉर्म क्र. अे/०००३१ सन २०१९–२० या मिळकतीच्या आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनीजा.क्र. मुलेप/२३३२,दि. १२/१२/२०२२ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रमांक १७, सन २०२२–२३ चा विचारासाठी.

**निर्णय – सदरचा विषय ऑडिट समितीकडे पाठविण्यात यावा.**

**विषय क्र. १२२२**

करआकारणी व करसंकलन कार्यालयाकडील पेठ येरवडा अे फॉर्म क्र. अे/००१५३७सन २०१८–१९ या मिळकतीच्या आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२३३३,दि. १२/१२/२०२२ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रमांक १८, सन २०२२–२३ चा विचारासाठी.

**निर्णय – सदरचा विषय ऑडिट समितीकडे पाठविण्यात यावा.**

**विषय क्र. १२२३**

करआकारणी व करसंकलन कार्यालयाकडील पेठ कोंढवा, वडगाव शेरी, धानोरी सन २०१९–२०, सन २०२०–२१ मधील मिळकतीच्या आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत

मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनीजा.क्र. मुलेप/२३३५,दि. १२/१२/२०२२ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रमांक १९, सन २०२२–२३ चा विचारासाठी.

**निर्णय – सदरचा विषय ऑडिट समितीकडे पाठविण्यात यावा.**

<u>**सर्वातकमी रक्कमेचे टेंडर्स**</u>

**विषय क्र.१२२४**

जुने पर्वती जलकेंद्र चालविणेसाठी सेवक पुरविणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री. स्वामी गोविंदा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८६,६५,६६८=९६ पेक्षा०.०१ % जास्त )असल्याने त्यांचेकडून र.रू. ८६,६६,५३५=५३ पर्यंत दि.०१/११/२०२२ पासून काम करून घेण्यासाठी व त्यांच्याबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/ ९६३, दि. ८/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२२५**

शिक्षण विभाग (प्राथमिक) पुणे महानगरपालिका शाळा इमारतीमधील स्वच्छतागृह दुरूस्ती विषयक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. ए.व्ही.एस एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८४,६२,३१०/–पेक्षा२७.८० % कमी )असल्याने त्यांचेकडून र.रू. ६१,०९,७८७=८२ अधिक जीएसटी र.रू. १०,९९,७६१=८०(१८ टक्के) अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. १३,८५५/– पर्यंत टेंडर अटी व शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस तसेच सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/शिक्षण विभाग (प्राथमिक)/९६४, दि. ८/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२२६**

पुणे महानगरपालिकेच्या कोंडवाडा विभागासाठी गुरेवाहक वाहन खरेदी करणे टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. एक्सेल व्हेईकल्स अ युनिट ऑफ माय कार पुणे प्रा.लि.पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ३५,२५,१४९/–पेक्षा– ०.९९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ३४,९०,२५०=३० (१८% जीएसटी अतिरिक्त)त्यानुसार एकूण रक्कम रू४१,१८,४९५=०३ पर्यंत जीएसटी, वाहतूक खर्च, आरटीओ रजिस्ट्रेशन या सर्व खर्चासह खरेदी करणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ई) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/९७४, दि. ९/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२२७**

स्वारगेट पाणीपुरवठा क्रमांक १ अंतर्गत येणाऱ्या कात्रज गुजरवाडी व इतर विविध भागात टँकरने पाणीपुरवठा करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. गुजर वॉटर सर्व्हिसेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ३९,९९,६५१/– पेक्षा ५.०० % कमी )असल्याने त्यांचेकडून र. रू. ३७,९९,६६८=४५ची निविदा मान्य करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति. महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/९७६, दि.१२/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२२८**

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागासाठी डायलेसिस रूग्णांकरिता पी.डी.बॉटल्स व इतर साधनसामुग्री खरेदी करणे (निविदा क्र. ११ सन २०२२–२३) कामीटेंडर्स मागविली असता ठेकेदार मॅट्रीक्स बायोमेडिक्स प्रा.लि.यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून खरेदी करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९७७, दि.१२/१२/२०२२ चे पत्र.

१) सन २०२२–२३ या आर्थिक वर्षात या निविदेतील निविदाधारक मॅट्रीक्स बायोमेडिक्स प्रा.लि. यांचेकडून रक्कम रूपये – ५०,००,०००/–पर्यंत आरोग्य विभागासाठी डायलेसिस रूग्णांसाठी पी.डी.बॉटल्स व इतर साधनसामुग्रींची एकूण ११ अॅटम्सची खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस.

२) सन २०२३–२४ या आर्थिक वर्षात खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर उपलब्ध होणाऱ्या आर्थिक तरतुदीमधून या निविदेतील पात्र निविदाधारक मॅट्रीक्स बायोमेडिक्स प्रा.लि. यांचेकडून आरोग्य विभागाकरिता डायलेसिस रूग्णांसाठी पी.डी.बॉटल्स व इतर साधनसामुग्रींची एकूण ११ अॅटम्सची खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस.

अर्थशिर्षक सन २०२२–२३

RE17F290 डायलेसिसच्या रूग्णांकरिता पी.डी.बॉटल्स खरेदी करणे.

मान्य तरतूद रक्कम रूपये ५०,००,०००/– पैकी ५०,००,०००/–

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२२९**

वडगांव जलकेंद्र केदारेश्वर, आगम मंदिर येथील पंपिंग यंत्रणांची देखभाल दुरूस्तीची कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. डेक्कन एन्टरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ३२,२८,८०७/-(CGST) वगळून पेक्षा १४.५% कमी )असल्याने त्यांचेकडून र. रू. २७,६०,६२९=९८अधिक जीएसटी र.रू. ४,९६,९१३=४० असे एकूण र.रू. ३२,५७,५४३=३८ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति. महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/९७८, दि.१२/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२३०**

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र.१ अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील कम्युनिटी टॉयलेट (CT), पब्लिक टॉयलेट (PT) व युरीनल यांची देखभाल दुरूस्ती कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सोहम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. २,४६,९१,६८५/-पेक्षा २०.०५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. १,९७,४०,७५५=२४१ पर्यंत तसेच अधिक प्रचलित दराने येणारा जीएसटी (१२%)व मे राज्य शासन/केंद्र शासन यांच्या सुधारीत व प्रचलित धारेणानुसार उर्वरीत जीएसटी (६%) असा एकूण (१८%) जीएसटी , अधिक रॉयल्टी चार्जेस, अधिक मटेरियल तपासणी ॲटपार दराने अदा व वसूल करणेस व त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (जनरल) यांचे जा.क्र. मआ/परि क्र. १/९७९, दि. १२/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२३१**

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र.४ अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील कम्युनिटी टॉयलेट (CT) व पब्लिक टॉयलेट (PT) व युरीनल यांची देखभाल दुरूस्ती कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे./ श्री. अक्षद कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. १,०२,५४,४९९/-पेक्षा २०.२०० % कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ८१,८३,०९०=२०२ (अधिक जीएसटी सह ) अधिक टेंडर अटी शर्तीनुसार भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/परि क्र. ४/९८१, दि. १२/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२३२**

आरोग्य खाते किटक प्रतिबंधक विभागसाठी बायफेन्थ्रीन १० % डब्लू.पी. (ISI MARK) पुरविणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी लघुत्तम दर देणारे ठेकेदार मे. प्रोटेक्ट, मुंबई यांचेकडून एकूण १०९० किलो बायफेन्थ्रीन १० % डब्लू.पी.. (ISI MARK) या डासनाशक औषधाची र.रू. ४५,०५,६५१=२५ पर्यंत खरेदी करणे त्यासाठी त्यांचेशी करारनामा करणेस व त्यापोटी होणारे बिल सन २०२२-२३ RE17F133F या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/ आरोग्य/९८०,दि. १२/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२३३**

Setting up a 50 MTPD Dry waste processing plant,on DBFOT basis for conversion of Municipal Solid Waste (Dry Waste)along with its operation and maintenance for a period of 10 years +5 year,s, Near Katraj dairy behind Kartraj ramp and fire station, Pune-46(RPF पद्धतीची निविदा)कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे. एक्सेल इंडस्ट्रीज लि. मुंबई यांचेकडून त्यांचे टेंडर दर र.रू. ३५९ प्रती मे. टन (GST विरहीत) याप्रमाणे २ ते १५ वर्षासाठी प्रति वर्षीप्रती मे.टन २% कमी दर, याप्रमाणे प्रती दिन ५० मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया करणेस व प्रत्यक्ष प्रक्रिया होणाऱ्या कचऱ्याच्या प्रमाणात प्रती मे.टन टिपिंग फी अदा करून काम करून घेणेस व त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/९८३,दि. १४/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**मागीलसभेचे विषय**

**विषय क्र.१२३४**

पुणे मनपाच्या परिमंडळ क्र. ५ अंतर्गत बिबवेवाडी स्मशानभूमी येथे ए.पी.सी. सिस्टिम पुरविणे, बसविणे चालू करून देणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. निकिता बॉयलर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुगप र.रू. ९५,२९,५०४=१८ (१८%जीएसटी सह ) मधील निविदा र.रू. ८०,७५,८५१/- (अधिक १८%जीएसटी) पेक्षा००.००% कमी (तडजोडी अंती)) असल्याने त्यांचेकडून र.रू. ८०,७५,८५१/- (अधिक १८%जीएसटी )र.रू. १४,५३,६५३=१८ असे एकूण र.रू. ९५,२९,५०४=१८ (१८%जीएसटी सह) चे पर्यंत काम करून घेणेस, सदरचे काम सुरू करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व

त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/८९६, दि. २३/११/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनीकरण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्यासभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र.१२३५**

पुणे मनपाच्या परिमंडळ क्र. १ मधील खराडी स्मशानभूमी मध्ये पर्यावरणपूरक ए.पी.सी. सिस्टिमची उभारणी करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. निकिता बॉयलर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुगप र.रू. ९८,२४,७२०=१२ (१८% जीएसटीसह) मधील निविदा र.रू. ८३,२६,०३४/– (अधिक १८%जीएसटी) पेक्षा ००.००% कमी (तडजोडी अंती) ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ८३,२६,०३४/– अधिक १८%जीएसटी र.रू. १४,९८,६८६=१२ असे एकूण र.रू. ९८,२४,७२०=१२ (१८%जीएसटीसह) पर्यंत काम करून घेणेस, सदरचे काम सुरू करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/९०३, दि. २३/११/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र.१२३६**

मनपा शाळा इमारतीमध्ये CCTV कॅमेरे बसविणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. आय सिक्युर आय टी प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुगपर.रू. ७९,९९,९९२/– मधील निविदा र.रू. ६७,७९,६५४/– (अधिक प्रचलित दराने येणारा १८ %जीएसटी ) पेक्षा०.५०% कमी दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ६७,४५,७५५=७३ अधिक जीएसटी १८ % र.रू. १२,१४,२३६=०३ असे एकूण र.रू. ७९,५९,९९१=७६ पर्यंत काम करून घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ईस्टेट) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/९१० दि. २३/११/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र. १२३७**

१५ व्या वित्तीय आयोग अंतर्गत पुणे महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या निधीमधून पुणे शहरातील घनकचरा व्यवस्थापन करणे करिता टिपर खरेदी करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. एक्सेल व्हेईकल्स अ युनिट ऑफ माय कार पुणे प्रा.लि, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( पु.ग.प. र. रु. ५,८७,८२,३७५/– पेक्षा २५.६०% जास्त व पूर्वगणनपत्रक (ज्यामध्ये जीएसटी चा समावेश आहे) रक्कमेपक्षा (+) १६.१७% जास्त) असल्याने १ नग करिता रक्कम रू. १९,२९,०३७=४१ (जीएसटी अतिरिक्त १८%) नुसार रक्कम रू. २२,७६,२६४=१४ जीएसटी, वाहतूक, आरटीओ, रजिस्ट्रेशन या सर्व खर्चासह याप्रमाणे ३० नग ९ क्यू. मी. क्षमतेचे टिपर करिता र.रू. ५,७८,७१,१२२=२८ (जीएसटी अतिरिक्त १८%) नुसार र.रु. ६,८२,८७,९२४=२९ जीएसटी, वाहतूक, आरटीओ, रजिस्ट्रेशन या सर्व खर्चासह खरेदी करणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/६८४,दि. २९/९/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२३८**

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय वारजे कर्वेनगर अंतर्गत आऊटसोर्सिंगने कचरा संदर्भात कामे करून घेणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री. प्रियांक एंटरप्रायझेस यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे( टेंडर र.रु. ९,३०,२१,२३२=२०पेक्षा ०.००% अॅटपार दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९,३०,२१,२३२=२० पर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/७४०, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र.१२३९**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिटनोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्ते व पुल विकसित करणे या प्रकल्पाअंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिटनोट निर्माण करणे या करिता सॉफ्टवेअर बनविणे व डेव्हलपमेंट क्रेडिटनोटची छपाई तसेच अनुषंगिक प्रिंटर खरेदी करणे (बी–२ पद्धतीची) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. न्याती टेक्नोलॉजीस प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून र.रु. ८२,८४,७५४/– अधिक जी.एस.टी. पर्यंत अदा करणेस / करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इस्टेट) यांचे जा.क्र. मआ/पथ/६४३,दि. २३/९/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र. १२४०**

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील वाहनतळांचे बाबतीत कोवीड–१९ या साथरोगाचे कालावधीतील वार्षिक मक्ता रकमेमध्ये काही प्रमाणात सवलत मान्य करणेबाबत मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता, मा.आबा बागुल व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. १२/४/२०२१ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. १२/४/२०२१ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/प्रकल्प/८०७ दि.३/११/२०२१ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र. १२४१**

पुणे शहराच्या हद्दीमधील रस्त्यांवर विविध सेवा वाहिन्या टाकणेसाठी शासकीय संस्थांना देण्यात येणारी सवलत रद्द करणेयाकरिता खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/७११ दि. ११/१०/२०२१ चे पत्र.

१. मा. मुख्य सभेने ठ.क्र. ७० दि. २२/६/२०१५ अन्वये पारित केलेला ठराव निरस्त करणेस.

२. मे.एम.एन.जी.एल., महाराष्ट्र राज्य विदयुत महामंडळ व इतर सर्व शासकीय संस्थाना रस्ता पुर्नस्थापना दरामध्ये देण्यात येणारी सवलत रद्द करुन पुणे महानगरपालिकेमार्फत दरवर्षीच्या दरपत्रकानुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दराप्रमाणे दर आकारणेस.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र. १२४२**

अग्निशमन सेवापुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन /७१ दि. २०/५/२०२० चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र. १२४३**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र. १२४४**

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सद्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरातवाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/आरोग्य/१००७ दि.२२/३/२०२१ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र. १२४५**

भूमीगत केबलसाठी आकाणी करावयाच्या मालमत्ता कराच्या धोरणाबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/टिजीओ/४२२ दि.१०/८/२०२१ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र. १२४६**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेश शुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेशशुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेश शुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

**विषय क्र. १२४७**

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक/ खाजगी/ सरकारी/ निमसरकारी संस्था/मंडळे/मा.सभासद/लोकप्रतिनिधी इत्यादीकडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी सजावटीकरीता

त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

| अ.क्र. | तपशील | प्रचलितदर (र.रु.) | प्रस्तावितदर (र.रु.) |
|---|---|---|---|
| १) | पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत भाडयाने देण्यात येणाऱ्या कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम | भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी<br>अनामत – र.रु. १०/– | भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन<br>अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी |

( टीप – सदर विषयाचा विचार ८ दिवसांनीकरण्यात यावा, असे दि. ८/१२/२०२२ च्यासभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.**

<u>संकीर्ण</u>

**विषयक्र. १२४८**

पुणे कर्वे रोडवरील गरवारे शाळेसमोरील स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांचे जीवन प्रसंगावर आधारित दाखविण्यात येणाऱ्या जीवनपटासाठीच्या हॉल व स्मारक हे ना नफा ना तोटा या तत्वावर ३० वर्षे कालावधीसाठी संयुक्त प्रकल्प अंतर्गत विवेक व्यासपीठ या संस्थेस चालविणेस देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सांस्कृतिक/८५३,दि.१६.११.२०२२ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२०, दि. ८/१२/२०२२.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२४९**

कोथरूड स.नं.८७ येथील भारतरत्न सचिन तेंडूलकर व्यायामशाळा (२ हॉल) (क्षेत्रफळ १५९.७८ चौ.मी.) लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षा करीता चालविणेस देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रिडा/८६२,दि.२१.११.२०२२ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२२, दि. ८/१२/२०२२.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषयक्र.१२५०**

प्रभाग क्र.५ वडगावशेरी येथील कल्याणीनगर स.नं.२१३ फा.प्लॉट नं.७५ येथील क्रीडा संकुल (क्षेत्रफळ ७१५७.०० चौ.मी.) लिव्ह ॲण्ड लायसेन्सतत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रिडा/८६३,दि.२१.११.२०२२ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२३, दि. ८/१२/२०२२.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषयक्र.१२५१**

पुणे महानगरपालिका स्तरावर अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र देताना आकारणी करावयाच्या फी मध्ये सुधारणा करणेसाठी खालील बाबींस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अशाद/९६५, दि. ८/१२/२०२२ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका अग्निशमन सेवेच्यावतीने बांधकाम परवानगी प्रकरणी विविध इमारती/तिच्या भागांना, विविध व्यवसायांना ना हरकत प्रमाणपत्र देणेपूर्वी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम ११ नुसार अग्निशमन सेवा फी व कलम १३ नुसार वार्षिक फी यांची मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट–अ मधील प्रस्तावित सुधारीत दरांनी आकरणी करणे, यापूर्वी आकारणी करण्यात येत असलेल्या फायर प्रीमियम चार्जेसची आकारणी बंद करणेस,

२) सदरील आकारणी करणेसाठी मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट–अ मधील प्रस्तावित उंचीच्या सुधारीत टप्प्यांना व सुधारीत दरांना पुणे महानगरपालिकेच्या मा. मुख्य सभेची मंजुरी मिळून मे. राज्य शासनाची अंतिम मंजुरी मिळेल या विश्वासावर मा.महापालिका आयुक्त यांच्या प्रशासकीय मान्यतेचे अधीन आकारणी सुरू करणेस,

३) मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट –अ मधील प्रस्तावित सुधारीत दरांना मा. मुख्य सभेची मंजुरी मिळून मे. राज्य शासनाची अंतिम मंजुरी मिळताना दर कमी झाल्यास जादा रक्कम ही त्याच प्रकल्पामध्ये बांधकाम विभागास भरावयाच्या रक्कमेमध्ये समायोजित करणेस आणि दरवाढ झाल्यास वाढीव रक्कम तत्काळ भरणार अशा आशयाचे हमीपत्र विकसकाकडून लिहून घेणेस.

४) यापूर्वी मा. स्थायी समितीने ठराव क्र.१६८३, दि.१४/१२/२०२१ अन्वये मंजुरी देऊन मा. मुख्य सभेमध्ये मंजुरीसाठी सादर केलेल्या प्रस्ताव मागे घेणेस,

५) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/२८५, दि.१८/०७/२०२२ अन्वये प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेला प्रस्ताव व त्यामधील बाबी रद्द करणेस.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषयक्र. १२५२**

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग–२ व वर्ग–३ या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेसाठी नेमण्यात आलेल्या संस्थेस बिल अदा करणेसाठी प्रकरणी वर्ग–२ व वर्ग–३ मधील एकूण ६ संवर्गातील पद भरतीसाठी उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविणेत आलेले असून व त्यानुसार सर्व उमेदवारांच्या Online परिक्षा घेण्यात आल्या आहेत. त्यानुसार INSTITUTE OF BANKING PERSONNEL SELECTION(IBPS) या संस्थेने परीक्षांची देयके सादर केली आहेत. त्यानुसार पुणे महानगरपालिकेमार्फत बिलांनुसार एकूण र.रू. ५,५८,९९,९३९/– मधून १०%आयकर, १% CGST, व १% SGST असे एकूण र.रू. ६६,१३,८६५/– कपात करून उर्वरित निवळ देय र.रू. ४,९२,८६,०७४/– मे. IBPS या संस्थेस अदा केले आहे. तरी अदा केलेल्या रकमेस पश्चात मान्यता मिळणेस व उर्वरित देयक र.रू. १,१५,७०,३५०/– यामधून १०% आयकर, १% CGST, व १% SGST असे एकूण र.रू. २,४७,५२१/– कपात करून निव्वळ देय र.रू. १,१३,२२,८२९/– अदा करणेस मान्यता मिळणेसाठी सदरची बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ मधील नियम २ मधील तरतूद क्र.२ नुसार पश्चात मान्यता मिळणेबाबत मा. महा. आयुक्त यांचेजा.क्र. मआ/साप्र/९६६, दि. ८/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२५३**

जाहिरात शुल्क दरवाढ करणेसाठी जाहिरात नियम २०२२ चे तरतुदीनुसार तसेच मे. उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट याचिका क्र. १९६८/२०१३ मधील निर्देशानुसार प्रचलित जाहिरात शुल्क दर २२२/– प्रति.चौ.फुट प्रति वर्ष प्रमाणे या दरामध्ये सन २०१३ ते सन २०२२ पर्यंत वाढ गृहीत धरून त्यापुढील तीन वर्षाकरिता दरवर्षी १०%दरवाढ करणेस आणि नव्याने समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायत हद्दीतील जाहिरात फलकांना मा. महा.आयुक्त यांचे विषपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमूद प्रस्तावित दरामध्ये ५०% वाढ करण्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/ आकाशचिन्ह व परवाना/९७३,दि. ९/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२५४**

पुणे पेठ लोहगाव कर्मभुमीनगर ते नाल्यापर्यंत जुनी मलवाहिनी बदलणे व मोठ्या व्यासाची मलवाहिनी विकसित करणेकामी ठेकेदार मे. बी.एन.चव्हाण यांचेकडून अॅटपार दराने र.रू. ८३,१९,२२६=९० अधिक जीएसटी (१८%) र.रू.१४,९७,४६०=८४, अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १,८१,४०७=७३ असे एकूण र.रू. ९९,९८,०९५=४७ रक्कमेचे केलेल्या कामाचे देयक अदा करणेस त्यांच्याशी करारनामा करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मलनिःस्सारण/९८४,दि. १४/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१२५५**

कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी सुरक्षा विभागामार्फत अतिरिक्त बहुद्देशीय कामगार पुरविणे हे काम साथ असेपर्यंत अथवा दि. ३१/०३/२०२१ पर्यंत होणारा खर्च अवलोकनार्थ सादर करणेबाबत तसेच दि.१/४/२०२१ ते दि. ३१/८/२०२१ अथवा कोरोना असे पर्यंत २०० बहुद्देशीय कामगार घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सुरक्षा/९८५,दि. १५/१२/२०२२ चे पत्र.

१. मे. सैनिक इंटेलिजन्स अॅण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडून दि. १५/४/२०२० ते ३१ मार्च २०२१ पर्यंत कोराना सेटंर, स्वॅब सेंटर, लसीकरण केंद्र, निवारा केंद्र येथे पुरविण्यात आलेल्या २०० अतिरिक्त बहुद्देशीय कामगारांवर झालेले रक्कम रूपये २,८७,५२,८१६=०८ (दोन कोटी सत्याऐंशी लाख बावन्न हजार आठशे सोळा रूपये आठ पैसे फक्त )
२. मे. सैनिक इंटेलिजन्स अॅण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांना एप्रिल – २१ ते ऑगस्ट – २१ पर्यंत कोविड कामासाठी रक्कम रूपये २,११,९१,९७६=४१ ( अक्षरी रूपये दोन कोटी अकरा लाख एक्यावन्नव हजार नऊशे श्याहत्तर पैसे एक्केचाळीस फक्त ) अदा करणेकामी सुरक्षा विभागाचे अंदाजपत्रक, बजेटकोड RE11D130 या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२५६ त्वर्य**

वाहन चालक, जेसीबी ऑपरेटर, वाहन चालक प्रमुख व मोटार वाहन विभाग/ कर्मशाळा कामगार सेवक व अन्य सेवकांना जादा कामाच्या तासाच्या मर्यादेबाबत खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/९८८,दि. १५/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२५७ त्वर्य**

काळुबाई नगर वाघोली येथील उर्वरित मलवाहिन्यांची कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.संदिन एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८२,८४,०८०/–पेक्षा३५.८२ % कमी )असल्याने त्यांचेकडून र.रू. ५३,१६,७२२=५४ व अधिक जीएसटी र.रू. १४,९१,१३४/– अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. २,२४,५९२/– असे एकूण र.रू. ७०,३२,४४८=५४ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून

घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि/९९१,दि. १६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२५८ त्वर्य**

आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय योजनेअंतर्गत परवानाधारक औषधे विक्रेत्यांकडून दैनंदिन स्वरूपात सर्व प्रकारच्या औषधे व इतर साहित्यांची खरेदी करणेकामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (जनरल) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९५,दि. १६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२५९ त्वर्य**

मास्टर प्लॅननुसार भैरोबा सिवेज डिस्ट्रिक (एस.डी–३) अंतर्गत अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहिन्या बदलणे व आवश्यक क्षमतेच्या मोठ्या व्यासाच्या मलवाहिन्या विकसित करणेकामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि/९९६,दि. १६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२६० त्वर्य**

मास्टर प्लॅननुसार खराडी सिवेज डिस्ट्रिक (एस.डी–१५) अंतर्गत अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहिन्या बदलणे व आवश्यक क्षमतेच्या मोठ्या व्यासाच्या मलवाहिन्या विकसित करणेकामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि/९९७,दि. १६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२६१ त्वर्य**

मास्टर प्लॅननुसार कल्याणीनगर सिवेज डिस्ट्रिक (एस.डी–१२) अंतर्गत अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहिन्या बदलणे व आवश्यक क्षमतेच्या मोठ्या व्यासाच्या मलवाहिन्या विकसित करणेकामी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि/९९८, दि. १६/१२/२०२२ चे पत्र

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२६२ त्वर्य**

मास्टर प्लॅननुसार वडगाव सिवेज डिस्ट्रीक ( एस–डी–६) अंतर्गत अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहिन्या बदलणे व आवश्यक क्षमतेच्या मोठया व्यासाच्या मलवाहिन्या विकसित करणेकामी मान्यता मिळणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/ मलनिःस्सारण / ९९९, दि. १६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२६३ त्वर्य**

मास्टर प्लॅननुसार विठ्ठलवाडी सिवेज डिस्ट्रीक ( एस–डी–५) अंतर्गत अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहिन्या बदलणे व आवश्यक क्षमतेच्या मोठया व्यासाच्या मलवाहिन्या विकसित करणेकामी मान्यता मिळणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/ मलनिःस्सारण /१०००, दि. १६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२६४ त्वर्य**

वाघोली येथील प्रियांकानगर( डेल विलास सोसायटी ) येथे उर्वरित मलवाहिन्याची कामे करणेकामी मान्यता मिळणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/ मलनिःस्सारण /१००१, दि. १६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२६५ त्वर्य**

संगमवाडी टी.पी.स्कीम फा. प्लॉट क्र.९८ पुणे येथील नायडू हॉस्पिटल आवारामध्ये पुणे महानगरपालिकेच्या वैद्यकीय ट्रस्टचे भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत बांधणे (स्थापत्य व विद्युत विषयक कामे) या कामासाठी अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध करणे त्यानुषंगाने येणाऱ्या खर्चाचे दायित्व स्विकारण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील १९४९ चे कलम ७२ (ब) अन्वये मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/१००७, दि. १६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १२६६ त्वर्य**

संगमवाडी टी.पी.स्कीम फा. प्लॉट क्र.९८ पुणे येथील नायडु हॉस्पिटल आवारामध्ये पुणे महानगरपालिकेच्या वैद्यकीय ट्रस्टचे भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत बांधणे (स्थापत्य व विद्युत विषयक कामे) कामी मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/भवन/१०१५, दि. १६/१२/२०२२ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**सही/–xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**सही/–xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**